दिनांक २३ ते २६ मार्च २०१८ या कालावधीत नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग व शरीर सौष्ठव स्पर्धा मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१८/प्र.क्र.३३/क्रीयुसे-२,

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:-२७ मार्च, २०१८

वाचा:- (१) केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ क्रमांक-५९/०२/२०१७-१८ /सीसीएससीएसबी यांचे दिनांक ०७.०३.२०१८ चे पत्र.

(२) सचिवालय जिमखान्याचे पत्र क्र.-अभानासे/ पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग व शरीर सौष्ठव /२०१७-१८, दि. १६.०३.२०१८.

(३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग,मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री/ अभानासे/१७-१८/का-४/७६२, दि.२०.०३.२०१८.

: शासन निर्णय :

दिनांक २३ ते २६ मार्च, २०१८ या कालावधीत नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या **अखिल भारतीय नागरी सेवा पॉवरलिफ्टिंग, वेटलिफ्टिंग व शरीर सौष्ठव स्पर्धा २०१७-१८** मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता सचिवालय जिमखाना, मुंबई येथे दिनांक १४ मार्च, २०१८ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेल्या राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्य संघाच्या सदर स्पर्धेतील सहभागासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे रु. ३१,४००/-(रुपये एकतीस हजार चारशे फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येतआहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किटबॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील. या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक/ व्यवस्थापक यांना दिनांक १७ मार्च, २०१८ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे या खेळाडूंना दिनांक १९ व २० मार्च, २०१८ या कालावधीतील प्रशिक्षण शिबिरासाठी सचिवालय जिमखान्यात उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच त्यानंतर खेळाडूंनी दिनांक २३ ते २६ मार्च, २०१८ या कालावधीतील स्पर्धेत उपस्थित राहावे. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या

अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. संघातील खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची प्रशिक्षण शिबीर व स्पर्धा काळातील कार्यालयीन अनुपस्थिती ही शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई-१४८५/ प्र.क्र.८३३/ अ/सेवा-९,दिनांक११ मे,१९८९ वक्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसानंतर खेळाडूंनी मुख्यालयास परत यावे. या सर्वाचा प्रवासभत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या/ कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी/ कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९,दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबईबाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास/ दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-१४८५/ प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८,दिनांक२७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी. या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनाला सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी “२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षितलेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र"ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१०१२४८०४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.27 10:13:32 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे
३. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई,
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखावअनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय,मुंबई.
९. मानद महासचिव,सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११. निवड नस्ती (क्रीयुसे-२).

विवरणपत्र "अ"

दिनांक २३ ते २६ मार्च, २०१८ या कालावधीत नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा पॉवरलिफटींग, वेटलिफटींग व शरीरसौष्ठव स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या पॉवरलिफटींग, वेटलिफटींग व शरीरसौष्ठव संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	ट्रॅकसूट	विभाग/ कार्यालय
१	संदेश श. इवलेकर	नाही	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
२	भगवान वि. खोपकर	होय	आस्थापना अधिकारी-१, राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, माझगांव, मुंबई.
३	मनोज भि. चौधरी	नाही	जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, कोर्ट नाक्याजवळ, ठाणे (प)
४	संजय भि. शेंडगे	होय	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
५	कमलेश ग. लाड	होय	जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६	विष्णू द. पाटील	होय	माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७	रामचंद्र स. गावडे	नाही	व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय ,मुंबई.
८	संदीप आवारी	नाही	तहसिल कार्यालय, भिवंडी, जिल्हा § ठाणे.
९	श्री. सुरेश खाडे प्रशिक्षक	होय	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०	मिलिंद पेडणेकर व्यवस्थापक	नाही	नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०	मनोज भि. बागडे	नाही	कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला, जिल्हा- अकोला.
११	नारायण त्रं. वाघ	होय	परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, बांद्रा (पू), मुंबई.
१२	अनिल न. घरडे	होय	सहनिबंधक, सहकारी संस्था (आ.वि.) महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास भवन, नाशिक-१.
१३	निलेश कि. पाटील	होय	प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, दिंडोरी रोड, नाशिक-४.
१४	संदेश इवलेकर	नाही	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
१५	भगवान खोपकर	नाही	आस्थापना अधिकारी-१, राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, माझगांव, मुंबई.
१६	तुषाल मडावी	होय	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
१७	कमलेश ग. लाड	नाही	जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
१८	रामचंद्र स. गावडे	नाही	व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय ,मुंबई.
१९	सचिन बोरसे	नाही	उपनियंत्रक शिधावाटप ई परिमंडळ, वडाळा, मुंबई.
२०	मनोज सिलेलान	नाही	महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नरीमन पॉईन्ट, मुंबई.

२१	राहुल पाटील	होय	लेखा परिक्षक-I, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई.
२२	सुनिल देसाई प्रशिक्षक	होय	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३	काशिराम आरोसकर व्यवस्थापक	होय	मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.27 10:13:42 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र "ब"

२३ ते २६ मार्च, २०१८ या कालावधीत नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा पॉवरलिफटींग, वेटलिफटींग व शरीरसौष्ठव स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या संघास कराव्या लागणाऱ्या खर्चाचा तपशील.

क्र.	तपशील	रुपये
१	**पूर्व चाचणी :** स्टेशनरी, पोष्टाची तिकीटे, पत्रव्यवहार, टॅक्सी भाडे इत्यादि वरील खर्च.	५००
२ अ)	**निवड चाचणी** : निवड चाचणीस उपस्थित राहिलेल्या पॉवरलिफ्टींग, वेटलिफ्टींग व शरीरसौष्ठव असोसिएशनचे प्रतिनिधी / पंच यांना मानधन, प्रकाश व्यवस्था, ध्वनिप्रक्षेपण, उपस्थित अधिकारी, जिमखान्याचे पदाधिकारी यांना अल्पोपहार / चहापान यावरील खर्च.	४,०००
३	**प्रशिक्षण शिबीर** : निवड झालेल्या सर्व स्पर्धकांसाठी दि. १९ व २० मार्च, २०१८ या कालावधीत संपूर्ण दिवस प्रशिक्षण शिबीरासाठी फ्लॅटफॉर्म भाडे, प्रशिक्षकाचे मानधन, प्रशिक्षक खेळाडू करीता अल्पोपहार, प्लॅटफॉर्म भाडे इत्यादि वरील खर्च.	४,०००
४	**साहित्य खरेदीसाठी होणारा खर्च :**	
१)	१२ ट्रॅक सूट रु. ७००/- प्रमाणे	८,४००
२)	२० टि शर्ट रु. ५००/- प्रमाणे	१०,०००
३)	पॉवरलिफ्टींग बेल्ट रु. २५००/-	२,५००
	वेटलिफ्रटींग बेल्ट रु. १,५००/-	१,५००
३)	प्रथमोपचार व किरकोळ खर्च.	५००
	एकूण रुपये : एकतीस हजार चारशे फक्त	**३१,४००/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.27 10:13:51 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र - क

२३ ते २६ मार्च, २०१८ या कालावधीत नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा पॉवरलिफटींग, वेटलिफटींग व शरीरसौष्ठव स्पर्धा २०१७-१८ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या पॉवरलिफटींग, वेटलिफटींग व शरीरसौष्ठव संघाची निवड करण्यासाठी दि. १४ मार्च, २०१८ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले अधिकारी कर्मचारी खेळाडूंची नावे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	विभाग / कार्यालय
१	संदेश श. इवलेकर, स्वच्छक	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
२	भगवान वि. खोपकर, राज्यकर निरिक्षक	आस्थापना अधिकारी-१, राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, माझगांव, मुंबई.
३	मनोज भि. चौधरी, लिपिक टंकलेखक	जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे, कोर्ट नाक्याजवळ, ठाणे (प)
४	संजय भि. शेंडगे, परीचय प्रतिरुप	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
५	कमलेश ग. लाड, लिपिक टंकलेखक	जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६	विष्णू द. पाटील, लिपिक टंकलेखक	माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७	रामचंद्र स. गावडे, वरीष्ठ लिपिक	व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय ,मुंबई.
८	संदीप आवारी, नायब तहसिलदार	तहसिल कार्यालय, भिवंडी, जिल्हा - ठाणे.
९	मनोज भि. बागडे, आरेखक	कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला, जिल्हा- अकोला.
१०	नारायण त्रं. वाघ, मोटार वाहन निरिक्षक	परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, बांद्रा (पू), मुंबई.
११	अनिल न. घरडे, वरीष्ठ लिपिक	सहनिबंधक, सहकारी संस्था (आ.वि.) महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास भवन, नाशिक-१.
१२	निलेश कि. पाटील, प्रयोगशाळा परिचर	प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, दिंडोरी रोड, नाशिक-४.
१३	तुषाल मडावी, बांधणी सहाय्यकारी	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
१४	सचिन बोरसे, शिधावाटप निरिक्षक	उपनियंत्रक शिधावाटप ई परिमंडळ, वडाळा, मुंबई.
१५	मनोज सिलेलान, शिपाई	महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नरीमन पॉईन्ट, मुंबई.
१६	राहुल पाटील, राज्यकर सहाय्यक	लेखा परिक्षक-I, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई.
१७	यशवंत तावडे, विक्रीकर निरिक्षक	आ.अ. विसआ(अन्वे-अ), विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई.
१८	एस.बी. सपकाळे, वनरक्षक	वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, रावेर स्टेशन रोड, जुन तहसिल कचेरी आवार, ता. रावेर, जिल्हा जळगांव
१९	मिलिंद पेडणेकर, लघुलेखक	नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०	सुहास चव्हाण, अवर सचिव	विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१	प्रविण आरोसकर, अवर सचिव	मुख्यमंत्री कार्यालय, सा.प्र.विभाग, मंत्रालय, मुंबई
२२	सुरेश खाडे, उपसचिव	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३	सुनिल देसाई, सहा. कक्ष अधिकारी	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.27 10:14:02 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन